आरोग्य विभाग
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

---

दिनांक-०४/०३/२०२५

**विषय- श्री साईबाबा नवनि दर्शन रांग कॉम्पलेक्स मधील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व गार्डनिंगची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेकामी प्रि – बीड मिटींगचे इतिवृत्त.**

मंगळवार दि. ०४/०३/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. साई सभागृह येथे गोरक्ष गाडीलकर, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महोदय, यांचे अध्यक्षतेखाली श्री साईबाबा नविन दर्शन कॉम्पलेक्स मधील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग व गार्डनिंगची कामे आऊटसोर्स पध्दतीने करणेकामी ई – निविदा भरणेपुर्वी निविदाधारकांसमवेत अटी व शर्तीबाबत चर्चा करणेकामी प्रि – बीड मिटींग आयोजित करणेत आली होती.

**सभेसाठी खालील अधिकारी उपस्थीत होते.**

| | |
|---|---|
| श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से | मुख्य कार्यकारी अधिकारी, |
| श्री. भिमराज दराडे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी, |
| श्रीमती. मंगला वराडे | मुख्य लेखाधिकारी, |
| श्री. संदीपकुमार भोसले | प्रशासकीय अधिकारी, |
| श्री. बाबासाहेब कोते | प्र. अधिक्षक, आरोग्य विभाग. |
| श्री. शरद डोखे | प्र. कामगार अधिकारी, |
| श्री. प्रविण मिरजकर | प्र. अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थाने |
| श्री. योगेश गोरक्ष | प्र.अधिक्षक, व्दारावती भक्तनिवास |
| श्री. विजय वाणी | प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास |
| श्री. रविंद्र गायके | लिपीक, कामगार विभाग |
| श्री. दत्तात्रय देवकर, | लिपीक, आरोग्य विभाग. |

सभेचे सुरुवातीस उपस्थीत निविदाधारकांना सुचना करुन निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास मांडणेबाबत सुचना दिल्या, त्यानुसार उपस्थीत निविदाधारकांपैकी काही प्रतीनिधींनी त्यांच्या अडचणी / शंका / मुद्दे उपस्थीत केल्या त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**-एजन्सीव्दारे ई-मेलव्दारे विचारलेले प्रश्न –**

**१) शुभम सर्व्हीसेस, पुणे**

| अ.नं. | अडचणी / शंका / मुद्दे | खुलासा |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र शासनाची उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या खरेदी पुस्तीकेच्या पान क्र.६२ वरील मुद्या क्र.४.४.१.१ मधील अ. क्र.२ मधील अनुषंगाने अंदाजित वार्षिक निविदा रक्कम व त्याचे विभागीकरण निविदेमध्ये प्रकाशित करणे अनिवार्य असून ते करसहीत किंवा करविरहीत आहेत हे सुध्दा नमुद असावे. | सदर ई-निविदेत अंदाजित वार्षिक निविदा रक्कम देणे बंधनकारक नाही. याबाबत ई-निविदेत हाऊसकिपींग कामांसाठी आवश्यक मनुष्यबळ, मशिनरी, एकूण क्षेत्रफळ, दैनंदिन वापरासाठी आवश्यक स्वच्छता साहीत्य, केमिकल इ.चा समावेश पान नं.२४ ते २६ वर करण्यात आलेला आहे.<br>तसेच करांबाबत अट क्र.२१ व BOQ खाली दिलेल्या Note मध्ये नमुद प्रमाणे निविदा भरावी. |

| | | |
|---|---|---|
| २. | आलीकडच्या कालावधीत प्रकाशीत झालेली शिर्डी संस्थान रुग्णालय निविदा क्र.२०२४_SAI_1117844_1 मधील BOQ मध्ये नमुद असलेप्रमाणे किमान वेतन दर व भविष्यात होणारी वाढ ही संस्थानकडून वाढीनुसार देण्यात येईल असे नमुद असलेप्रमाणे सदरच्या निविदेमध्ये हयाप्रमाणे विचार करण्यात यावा | ई-निविदेतील अट क्र.२२ व २७ मध्ये नमुद आहे. |
| ३. | जानेवारी २०२५ मध्ये झालेली वेतनवाढ नुसार किमानवेतन दर विचारात घेऊन ई-निविदा भरावयाची आहे किंवा कसे मुद्या क्र.२२ व २६ मधील स्पष्टता देण्यात यावी. | ई-निविदेतील अट क्र.२१ व २२ मध्ये नमुद प्रमाणे निविदा सादर करावयाची आहे. |
| ४ | मशीनचे आयु ही ३ ते ५ वर्षाची असून एक वर्षापुर्वी घेतलेल्या मशीनरीचे बील सादर केल्यास तसेच सुस्थितीत असल्यास वापरण्याची परवानगी द्यावी. | सदरचे जुने मशिन वापरावयाचे झाल्यास ई-निवीदेत नमूद केलेले कंपनीचे तसेच १५ महिने कालावधीचे आतील असावे. (उदा. चायना मेड मशिनरी विचारात घेतली जाणार नाही) त्याबाबतचे संबंधित मशिनचे ISI कंपनीचे प्रमाणपत्र असावे. जुने मशिनरी असल्यास BOQ मधील अट क्र.२ मधील मशिन भाडे, विमा, वार्षिक मेंटेन्स चार्जेस दिले जातील व अट क्र. ३ मधील मशिन व उपकरणे चार्जेस अदा केले जाणार नाही. |
| ५. | सदर अटींची पुर्तता करणेकामी संस्थानकडून Form No-5 वेळेत मिळणे आपेक्षित असून लेबर कमिशनर ऑफिसमधील संबंधीत अधिका-याची उपलब्धता व तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन मुदतीचा पुर्नविचार करावा. | संस्थानकडून Form No-5 दिल्याचे दिनांकापासून पुढील १५ दिवसांत लेबर लासयन्स सादर करणे बंधनकारक राहील. |
| ६. | सदर अट मध्ये रु.९००/- दंडाची रक्कम कमी करुन एक दिवसाचे किमान वेतना इतका दंड आकरण्यात यावा. | ई-निविदेतील अट क्र.५८- इ मध्ये नमुद प्रमाणे राहील. |
| ७. | पर्यावरणाचा विचार करता कागदाचा अपव्यय टाळण्यास ाठी आवश्यक असलेल्या कर्मचा-यांस त्याच्या मागणीनुसार Salary slip देण्यात येईल. हयाबाबत योग्य निर्णय व्हावा. | दरमहा सॅलरी स्लीप सर्व कर्मचा-यांना ई-मेलव्दारे किंवा इतर पध्दतीने देणेस हरकत नाही. परंतु कर्मचा-यांनी मागणी केल्यास हार्ड कॉपी द्यावी लागेल. |
| ८. | भारत सरकारच्या नंबर ३१७/१४/१०००/२०१४ दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजीच्या अर्थ व उद्योग मंत्रालयाच्या कॉन्ट्रक्ट व टेंडरच्या संदर्भात असलेल्या Service Charge च्या बाबतीत निर्णयाचा आपल्या टेंडरमध्ये अवलंब करण्यात यावा. | ई-निविदेतील अट क्र.२६ मध्ये नमुद प्रमाणे राहील. |

२) एस पोळ एन्टरप्रायजेस, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | सदर कामाचा कार्यादेश मिळाल्यानंतर १५ ते २० दिवसामध्ये नाशिक विभाग नाशिक यांचेकडील स्वतंत्र प्राव्हीडंट फंड कोड प्रमाणपत्र सादर करण्यात येईल तसे निविदेसोबत हमीपत्र जोडण्यात येईल. | ज्या निविदाधारकास कामाचा कार्यादेश देण्यात येईल त्यांनी ई-निविदेतील अट क्र.५७ नुसार पुर्तता वेळेत करणे बंधनकारक राहील. |
| २ | सदर कामाचा कार्यादेश मिळाल्यानंतर १५ ते २० दिवसामध्ये नाशिक विभाग नाशिक यांचेकडील स्वतंत्र कर्मचारी राज्य विमा निगम (इ एस आय सी ) १९४८ प्रमाणपत्र सादर करण्यात येईल. तसे निविदेसोबत हमीपत्र जोडण्यात येईल. | ज्या निविदाधारकास कामाचा कार्यादेश देण्यात येईल, त्यांनी ई-निविदेतील अट क्र.३० नुसार पुर्तता वेळेत करणे बंधनकारक राहील. |
| ३ | सदर कामाचा कार्यादेश मिळाल्यानंतर १५ ते २० दिवसामध्ये ले प्रमाणपत्र सादर करण्यात येईल तसे निविदेसोबत हमीपत्र जोडण्यात येईल. | पान नं.०५ वरील निविदाधारकाने भरावयाची माहिती मधील मुद्दा क्र.१० लेबर लायसन्स अनिवार्य राहील. |

उपरोक्त प्रमाणे झालेल्या प्री-बीड मिटींगमध्ये ई-निवीदेतील अटी व शर्तीमध्ये बदल /समोवश करणेकामी ई-मेल व पत्राव्दारे मुद्दे उपस्थिती झाले असून, सदर मुद्यांबाबत खुलासा निवीदा धारकांचे माहितीसाठी संस्थानचे संकेतस्थळावर माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत प्रसिध्द तसेच ईडीपी विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस मान्यता असावी.

(बाबासाहेब कोते)
प्र.अधिक्षक

(संदिपकुमार भोसले)
प्रशासकीय अधिकारी

प्रकाशित मान्यता देणेत येत आहे.

(भिमराज दराडे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी